| | |
|---|---|
| MHSO200011722025 | **नियमीत दिवाणी दावा नं.२२५/२०२५**<br>(दशरथ लेंडवे वि. शिवाजी लेंडवे व इतर) |

## नि. १५ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जात प्रतिवादींचे कथन की, वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द दावा डिक्रेरेशन, सरस निरस मानाने वाटपाचा व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी नं. १ हे मजुरीनिमित्त परगावी असल्याने व मुदतीच्या आत वेळेत कागदपत्रे मिळाली नसल्यामुळे मुदतीत कैफियत व म्हणणे देता आले नाही. सदरची कैफियत व म्हणणे देण्यास ३ महिनयाचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब माफ केल्याने वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट, विलंब माफ न झाल्यास प्रतिवादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, झालेला विलंब माफ करण्यात येऊन कैफियत स्विकारण्याची विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादीने सदर अर्जाखाली आपले म्हणणे दिले की, सदरचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. अर्ज मंजूर करणेचे झाल्यास जास्तीत जास्त कॉस्ट करणेत यावी.

४. प्रतिवादी यांचा अर्ज वाचला. वादींचे म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी यांचेविरुध्द निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वास्तविक प्रतिवादी यांनी त्यांना समन्स बजावणीपासून साधारण ३० दिवसांच्या आत व त्यापुढे ६० दिवसांमध्ये म्हणजे एकूण ९० दिवसांच्या आत कैफियत दाखल करणे गरजेचे होते. कायद्याप्रमाणे कैफियत दाखल करणेची मुदत ९० दिवसांनी संपते. प्रतिवादी यांनी मुदतीत कैफियत दिलेली नाही. सदर

दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर असणे दाव्याचा न्यायनिर्णय गुणांगुणावर होण्यासाठी आवश्यक आहे. प्रतिवादी यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास तीन महिन्यांचा विलंब झाला असल्याचे कथन केले आहे. सदर विलंबाबाबत त्यांनी कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. प्रतिवादींनी दिलेले कारण संयुक्तिक वाटत नाही. तरी सदरचा दावा स्थावर मिळकतीच्या संदर्भात असल्यामुळे प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेख सदरी असणे दाव्याचा न्यायनिर्णय गुणदोषावर करणेसाठी अत्यंत आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी आपल्या अर्जाचे पुष्टयर्थ नि.१६ खाली शपथपत्र दाखल केले आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब खर्चाचे आदेश पारित करुन सदरचा विलंब माफ करणे न्यायोचित होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज नि.१५ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब वादीस रक्कम रु.२००/- देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

PATIL ARTEE ASHOKRAO
Digitally signed by PATIL ARTEE ASHOKRAO
Date: 2026.01.03 15:16:02 +0530

(**श्रीमती ए.ए.पाटील**)

दि. ०२/०१/२०२६.

सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला, जि. सोलापूर

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order :-

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | :- | Smt. S.S.Kolekar |
| (b) | Court | :- | Smt. A.A.Patil<br>Jt. Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Sangola. |
| (c) | Judgment/Order signed by PO on | :- | 02/01/2026 |
| (d) | Judgment/Order uploaded on | :- | 02/01/2026 |